एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत
मुल्यमापन व संनियंत्रण या बाबीअंतर्गत अंगणवाडी
सेविका व मिनी अंगणवाडी सेविका यांना MIS
मार्गदर्शिका व मुख्यसेविका यांना मार्गदर्शक
पुस्तिकेचा पुरवठा करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि-२०१४/प्र.क्र.२६५/का.६
नवीन प्रशासन भवन,३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५

वाचा :- १) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे पत्र जा.क्र. एबाविसेयो/का-६/१०५१/२०१४, दिनांक ०५.०९.२०१४
२) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दिनांक ७.०२.१९८४ चे परीपत्रक
३) प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगरभवन, मुंबई यांचे दिनांक १८.०४.२०१३ चे पत्र.

प्रस्तावना :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत संनियंत्रण व मुल्यमापन या बाबी अंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतिवर्ष प्रति अंगणवाडी रु.५००/- व प्रति मिनी अंगणवाडी रु.२५०/- याप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. या निधीतून ग्रामीण, आदिवासी व नागरी प्रकल्पातील "मुख्यसेविकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका" व अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका यांचेसाठी "अंगणवाडी सेविकांसाठी MIS मार्गदर्शिका" हे पुस्तक पुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत संनियंत्रण व मुल्यमापन या बाबी अंतर्गत ग्रामीण, आदिवासी व नागरी प्रकल्पातील "मुख्यसेविकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका" मूळ किंमत रु.२२०/- त्यावर २०% सूट याप्रमाणे रु.४४/- वजा जाता प्रति पुस्तक रु.१७६/- प्रमाणे ग्रामीण व आदिवासी प्रकल्पातील ३३७२ मुख्यसेविका यांना प्रत्येकी १ पुस्तिका याप्रमाणे एकूण ३३७२ पुस्तिका पुरवठा करण्यासाठी रुपये ५,९३,४७२/- व ग्रामीण, आदिवासी व नागरी प्रकल्पातील "अंगणवाडी सेविकांसाठी MIS मार्गदर्शिका" हे पुस्तक मूळ किंमत रु.१२०/- त्यावर २०% सूट याप्रमाणे रु.२४/- वजा जाता प्रति पुस्तक रु.९६/- प्रमाणे ग्रामीण, आदिवासी व नागरी प्रकल्पातील ९५३६५ अंगणवाडी सेविका यांना प्रत्येकी १ MIS मार्गदर्शिका याप्रमाणे एकूण ९५३६५ MIS मार्गदर्शिका पुरवठा करण्यासाठी रुपये ९१,५५,०४०/-तसेच ग्रामीण व आदिवासी प्रकल्पातील ९७५३ मिनी अंगणवाडी सेविका यांना प्रत्येकी १ MIS मार्गदर्शिका याप्रमाणे एकूण ९७५३ MIS मार्गदर्शिका पुरवठा करण्यासाठी रुपये ९,३६,२८८/- असे मिळून एकूण रुपये १,०६,८४,८००/- (अक्षरी रुपये एक कोटी चौऱ्याऐंशी हजार आठशे फक्त) इतका निधी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना कॉपी राईट धारक मे. जगतगुरु प्रिंटींग प्रा.लि. एम.आय.डी.सी., तुर्भे, नवी मुंबई यांच्याकडून खरेदी करुन पुरवठा करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास खालील अटींच्या अधिन राहून शासन मंजूरी देत आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | वस्तुचे विर्निदेश | प्रकल्प | अंगणवाडी सेविकांची संख्या | पुरवठा करावयाचे एकूण नग | दर रुपये (प्रतिनग) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ) | अंगणवाडी सेविकांसाठी MIS मार्गदर्शिका | तपशिल : आकार : ८" x ११" आतील मजकुर : १०२ पाने, ६८ GSM मॅपलिथो कागदावर मुखपृष्ठ :- २ पानी, चाररंगी छपाई, २१० GSM आर्ट पेपरवर बाईंडिग :- परफेक्ट बाईंडिग पध्दतीचे | ग्रामीण व आदिवासी प्रकल्प अंगणवाडी सेविका (प्रति अंगणवाडी सेविका १ नग) | ८०,११९ | ८०,११९ | ९६.०० | ७६,९१,४२४/- |
| | | | मिनी अंगणवाडी सेविका (प्रति मिनी अंगणवाडी सेविका १ नग) | ९,७५३ | ९,७५३ | ९६.०० | ९,३६,२८८/- |
| | | | नागरी प्रकल्प (प्रति अंगणवाडी सेविका १ नग) | १५,२४६ | १५,२४६ | ९६.०० | १४,६३,६१६/- |
| | | एकूण | ----- | १०५११८ | १०५११८ | ----- | १,००,९१,३२८/- |
| ब) | मुख्यसेविकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका | तपशिल : आकार : ८" x ११" आतील मजकुर : २०० पाने, ६८ GSM मॅपलिथो कागदावर मुखपृष्ठ :- ४ पानी, चाररंगी छपाई, २१० GSM आर्ट पेपरवर बाईंडिग :- परफेक्ट बाईंडिग पध्दतीचे | ग्रामीण व आदिवासी प्रकल्प (प्रति पर्यवेक्षिका १ नग) | २८५६ | २८५६ | १७६.०० | ५,०२,६५६/- |
| | | | नागरी प्रकल्प प्रति पर्यवेक्षिका १ नग) | ५१६ | ५१६ | १७६.०० | ९०,८१६/- |
| | | एकूण | ----- | ३३७२ | ३३७२ | ----- | ५,९३,४७२/- |
| | | एकूण अ + ब | ----- | १०८४९० | १०८४९० | ----- | १,०६,८४,८००/- |

२. "मुख्यसेविकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका" व "अंगणवाडी सेविकांसाठी MIS मार्गदर्शिका" ही पुस्तक खरेदी करतांना खालील अटी विचारात घेण्यात याव्यात :-

i) "मुख्यसेविकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका" हे पुस्तक [तपशिल : आकार : ८" x ११" आतील मजकुर : २०० पाने, ६८ GSM मॅपलिथो कागदावर मुखपृष्ठ :- ४ पानी, चाररंगी छपाई, २१० GSM आर्ट पेपरवर बाईंडिग :- परफेक्ट बाईंडिग पध्दतीचे ] व "अंगणवाडी सेविकांसाठी MIS मार्गदर्शिका" हे पुस्तक [तपशिल : आकार : ८" x ११" आतील मजकुर : १०२ पाने, ६८ GSM मॅपलिथो कागदावर मुखपृष्ठ :- २ पानी, चाररंगी छपाई, २१० GSM आर्ट पेपरवर बाईंडिग :- परफेक्ट बाईंडिग पध्दतीचे ] या स्वरुपात राहील.

ii) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी वरील "मुख्यसेविकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका" व "अंगणवाडी सेविकांसाठी MIS मार्गदर्शिका" ही पुस्तके पुरवठा विहीत नमुन्याप्रमाणे (Sample, specification) असल्याची खात्री करुन त्याबाबतचा अहवाल आयुक्त, एकात्मिक बाल विकास

सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना सादर करावा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी एकत्रित अहवाल महिला व बाल विकास विभागास सादर करावा.

iii) खरेदी शासकीय नियमानुसार तसेच विहित अटी व शर्तीप्रमाणे राहील. विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन या वस्तूंचा दर निश्चित करण्यात आला आहे तसेच Copy Right च्या अटी व शर्ती तसेच दर व दर्जा याची खात्री आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी करुन घ्यावी.

iv) सदर वस्तूंचा पुरवठा पुरवठाधारकामार्फत प्रकल्पस्तरावर करण्यात यावा. सदर पुरवठा प्रकल्प स्तरापर्यंत वेळेवर होईल याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी योग्य ती दक्षता घ्यावी. सदर वस्तूंचा पुरवठा प्रकल्पस्तरापर्यंत झाल्याची पोच मिळाल्यानंतरच देयके अदा करण्यात यावीत.

v) सदर वस्तूंचे खरेदी, वाटप, पुरवठा व विनियोगामध्ये काही अनियमितता झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची राहील.

vi) वरीलप्रमाणे "मुख्यसेविकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका" व "अंगणवाडी सेविकांसाठी MIS मार्गदर्शिका" ही पुस्तके पुरवठा झाल्यानंतर त्याचा वापर अंगणवाडी केंद्रातील लाभार्थी नियमीतपणे करतील याची योग्य ती काळजी घेण्यात यावी.

३. यासाठी होणारा खर्च हा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत संनियंत्रण व मुल्यमापन या बाबी अंतर्गत खालील लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवून त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

अ) ग्रामीण व आदिवासी प्रकल्प :-

१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा रु.८२,१७,३३१/- लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना- ग्रामीण (०४) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ याच्या कलम १२३ व २६१ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान (स्थानिक क्षेत्र) (केंद्र पुरस्कृत योजना ९० टक्के) (२२३६००७२) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)

२) राज्य शासनाचा १०% हिस्सा रु.९,१३,०३७/- लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (ग्रामीण) (०४) (०६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १२३ व २६१ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पाच्या आस्थापना विषयक बाबीसाठी जिल्हा परिषदाना अनुदान (१०% राज्य हिस्सा) (२२३६१३७३) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)

ब) नागरी प्रकल्प :-

१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा रु.१३,९८,९८९/- लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना- नागरी (०१) (०३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (केंद्र पुरस्कृत योजना ९० टक्के) (२२३६०५१९) २१ पुरवठा व सामग्री

२) राज्य शासनाचा १०% हिस्सा रु.१,५५,४४३/- लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना

(नागरी) (०१) (०८) एकात्मिक बाल विकास सेवा योजना - अंमलबजावणी व प्रशासकीय खर्च (१०% राज्य हिस्सा) (२२३६१३८२) २१ सामग्री व पुरवठा या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागवून, त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ ४८१/१४/व्यय-६, दिनांक १९.७.२०१४ व महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१४/प्र.क्र.२२१/का.६, दिनांक २१.७.२०१४ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. बा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
सहायक संचालक, (वित्त व लेखा) एबाविसेयो, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
मे. जगतगुरु प्रिंटींग प्रा.लि. एम.आय.डी.सी., तुर्भे, नवी मुंबई
महिला व बाल विकास विभाग, कार्यासन क्र.४
निवड नस्ती (कार्यासन ६)

निर्गमित
दिनांक २३।०७।२०१४